# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 08 June 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ०८ जून २०२४ सायंकाळी ६.१०

****

- नव्या सरकारच्या शपथग्रहण सोहळ्यासाठी शेजारील राष्ट्रप्रमुखांना निमंत्रणं
- खासदार राहुल गांधी यांच्या विरोधी पक्षनेतेपदी निवडीला एकमतानं मंजुरी
- वैद्यकीय अभ्यासक्रमासाठीची नीट परीक्षा पारदर्शकरित्या पूर्ण-परीक्षा परिषदेचा निर्वाळा
- ईनाडू समुहाचे प्रमुख पद्मविभूषण रामोजी राव यांचं हैद्राबाद इथं निधन

आणि

- मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पुन्हा सुरुवात

****

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, नरेंद्र मोदी उद्या सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती भवनात सायंकाळी होणाऱ्या या शपथग्रहण समारंभाला भारताच्या शेजारी राष्ट्रांचे प्रमुख नेते सहभागी होणार आहेत. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी आज नवी दिल्लीत ही माहिती दिली. श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे, मालदीवचे राष्ट्रपती डॉक्टर मोहम्मद मुइज्जू, सेशेल्सचे उपराष्ट्रपती अहमद अफीफ, बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, नेपाळचे पंतप्रधान पुष्पकमल दहल, भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे आणि मॉरीशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जगनौथ हे उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, या शपथविधी समारंभानंतर या नेत्यांची राष्ट्रपती भवनात बैठक होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

दिल्ली इथं आज काँग्रेस पक्षाच्या कार्यकारी मंडळाची बैठक पार पडली. काँग्रेस पक्षाचे खासदार राहुल गांधी यांची लोकसभेत विरोधी पक्ष नेता म्हणून निवड करण्याच्या प्रस्तावाला या बैठकीत एकमतानं मंजुरी देण्यात आली. पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, खासदार राहुल गांधी आदी नेते या बैठकीला उपस्थित होते. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळालेला जनतेचा कौल मान्य असून इंडिया आघाडी म्हणून आम्ही संसदेत आणि संसदेच्या बाहेरही कार्यरत राहणार असल्याचं खरगे यांनी सांगितलं.

****

भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ गटाची बैठक आज मुंबईत पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजप अध्यक्ष आमदार आशिष शेलार, यांच्यासह पक्षाचे आमदार बैठकीला उपस्थित होते. दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळाचा शपथग्रहण सोहळा होईपर्यंत प्रतीक्षेचा सल्ला भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी फडणवीस यांना दिल्याचं वृत्त आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित यश न मिळाल्याची जबाबदारी घेत, फडणवीस यांनी राजीनाम्याची तयारी दर्शवली होती, त्यावर अमित शहा यांनी त्यांना तुर्तात प्रतीक्षेचा सल्ला दिला आहे.

****

राज्यात दुष्काळग्रस्त भागातील जनतेला तातडीनं मदत द्या अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. यामागणीचे निवेदन त्यांनी राज्यपाल रमेश बैस यांच्याकडे सादर केलं. कोरडवाहू शेतीला एकरी २५ हजार रूपये, बागायती शेतीला ५० हजार रूपये आणि फळबागांना एकरी १ लाख रुपये मदतीची मागणी त्यांनी या निवेदनातून केली आहे. जनावरांसाठी चारा, पिण्याचे पाणी बियाणांचा पुरवठा यासारण्या सोयी करण्याचे निर्देश राज्य सरकारला द्यावेत अशी मागणीही पटोले यांनी केली.

****

इंडीया आघाडीला केवळ बहुजनांची मते हवी होती, संसदेमध्ये स्वतंत्र बहुजनांचे नेतृत्वच नको होते अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष विधिज्ञ प्रकाश आंबेडकर यांनी सामाजिक माध्यमातून केली आहे. जर या पक्षांना सामाजिकदृष्ट्या वंचित आणि शोषितांसाठी लढायचं असतं, तर वंचित बहुजन आघाडी स्थापन करण्याची गरजच पडली नसती, असं मत आंबेडकर यांनी व्यक्त

केलं आहे. वंचितांच्या न्याय हक्काचा आणि संविधान रक्षणाचा लढा सुरूच राहणार असून, आगामी काळात मोठ्या ताकदीने आणि विश्वासाने जनतेच्या पाठिंब्यावर पुनरागमन करू, असा विश्वास त्यांनी आपल्या संदेशात व्यक्त केला आहे.

****

राष्ट्रीय परीक्षा परिषद –एनटीएने वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेतलेली राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा–नीट ही संपूर्ण देशभरात पूर्णपणे पारदर्शकरित्या पार पडली असल्याचा निर्वाळा दिला आहे. एनटीएचे महासंचालक सुबोध कुमार सिंग यांनी आज नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या परीक्षेची कोणतीही प्रश्नपत्रिका फुटली नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. ज्या सहा परीक्षा केंद्रातील एक हजार सहाशे विद्यार्थ्यांचा चुकीच्या प्रश्नपत्रिकेच्या वितरणामुळे वेळ वाया गेला असल्याच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एनटीएने उच्चस्तरीय समिती स्थापन केली असल्याचं सिंग यांनी सांगितले. यावर्षी ५ मे रोजी ही परीक्षा घेण्यात आली आणि त्याचा निकाल या आठवड्यात ४ जूनला जाहीर झाला होता.

****

माध्यम जगतातील प्रख्यात व्यक्तिमत्व, पद्मविभूषण रामोजी राव यांचं तेलंगणातल्या हैद्राबाद इथं आज सकाळी निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. ईनाडू समूह आणि रामोजी चित्रपटसृष्टीचे ते संस्थापक होते. त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दुखः व्यक्त केलं आहे. देशानं माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील एक दिग्गज व्यक्तिमत्व गमावलं असून पद्मविभूषण पुरस्कारप्राप्त राव यांची दृष्टी सामाजिक उत्थानासाठी रुजलेली होती, अशा शब्दात राष्ट्रपतींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. काळजीवाहू पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही रामोजी राव यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. रामोजी राव भारतीय माध्यमांमध्ये क्रांती घडवणारे द्रष्टे होते. त्यांच्या समृद्ध योगदानानं पत्रकारिता आणि चित्रपट जगतावर छाप सोडली. देशाच्या विकासाबद्दल त्यांना अत्यंत तळमळ होती, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. रामोजी राव यांच्या निधनानं लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचं अपरिमित नुकसान झाल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

****

भारतीय प्लास्टिक उद्योगाने संशोधन, नाविन्यता आणि उत्कृष्टतेच्या माध्यमातून `ब्रँड इंडिया` निर्माण करावा, असं आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी केलं आहे. केंद्र शासनाच्या प्लास्टिक निर्यात प्रोत्साहन परिषदेतर्फे देण्यात येणारे `प्लास्टिक निर्यात

उत्कृष्टता पुरस्कार' राज्यपाल बैस यांच्या हस्ते काल मुंबईत प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सुप्रीम इंडस्ट्रीजचे अध्यक्ष एम. पी. तापडिया, यांना जीवन गौरव पुरस्कार, तसंच ७५ प्लास्टिक निर्यातदारांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्लास्टिक उद्योगाने पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय भूमिका बजावावी, तसंच प्लास्टिकचा पुनर्वापर आणि प्लास्टिक कचरा व्यवस्थापन याबाबत जागरूकता निर्माण करावी, असं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं.

****

आषाढी एकादशीनिमित्त पुणे शहरात ३० जून रोजी पालख्यांचं आगमन होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी पालखी मार्गांची पाहणी केली. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांच्या ठिकाणी सुसज्ज आपत्ती व्यवस्थापन कक्ष, रस्ते दुरूस्ती, अतिक्रमण, सुरक्षितता, पाणीपुरवठा, स्वच्छतागृहे, आरोग्यविषयक सेवा यासारख्या सोयीसुविधांचा आढावा भोसले यांनी घेतला.

****

नेरळ ते माथेरान मिनी ट्रेन आजपासून १५ ऑक्टोबर पर्यत बंद राहणार आहे. मध्य रेल्वेकडून जारी पत्रकात ही माहिती दिली आहे. माथेरानमध्ये दरवर्षी मोठा पाऊस पडतो, त्यातून दरडी कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन, दरवर्षी पावसाळ्यात ही ट्रेन बंद ठेवली जाते. नेरळ माथेरान मार्गावर ही ट्रेन बंद राहणार असली तरीही अमन लॉज ते माथेरान दरम्यान ही शटल सेवा सुरू राहणार असल्याचं, मध्य रेल्वेकडून सांगण्यात आलं आहे.

****

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटीत आजपासून आमरण उपोषण पुन्हा सुरू केलं आहे. या उपोषणासंदर्भात आंतरवाली सराटी इथल्या ग्रामपंचायत कार्यालयात ठराव घेण्यात आला, त्यात मनोज जरांगे पाटील यांच्या बाजूने पाच तर विरोधात पाच सदस्यांनी मतदान केलं. त्यानंतर सरपंचांनी आपलं निर्णायक मत मनोज जरांगे पाटील यांच्या बाजूने दिल्यावर उपोषणाला सुरुवात करण्यात आली. या पार्श्वभूमीवर आंतरवाली सराटी गावात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कायदा सुव्यवस्था बिघडू नये, याची जबाबदारी मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि पोलिस प्रशासनाची असल्याचं मत जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केलं. आपल्या मागण्या मान्य

झाल्या नाही, तर विधानसभा निवडणुकीत २८८ उमेदवार उभे करण्याचा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला.

****

सामाजिक सलोखा आणि सौहार्द जपण्याची जबाबदारी बीड जिल्ह्यातल्या प्रत्येक नागरिकाची आहे, असं आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. सामाजिक माध्यमांवर नेत्यांचे फोटो आणि बनावट व्हिडिओ टाकून, राजकीय नेत्यांवर टीका करणाऱ्या तसंच जाती-जातीत तेढ निर्माण करणाऱ्या खोट्या बातम्या पसरवल्या जात असल्याचं निदर्शनास आल्याच्या पार्श्वभूमीवर मुंडे यांनी हे आवाहन केलं आहे.

****

नांदेड इथं हिंगोली भागात वजीराबाद पोलिसांनी आज तीन गावठी पिस्तूल आणि पाच जिवंत काडतूसं जप्त केले. गोपाल चव्हाण, मनोज मोरे आणि शुभम सूर्यवंशी या तिघांना याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. या तिघांनी जालन्याच्या घनसांगवी इथल्या रणवीर सिंग याच्याकडून सदर पिस्तूल विक्रीसाठी आणण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात, शिवसेना शाखेच्या स्थापनेला आज ३९ वर्ष पूर्ण झाली. या निमित्तानं गुलमंडी इथं शिवसेनेच्या वतीने विशेष कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

****